# द्या हो असा चष्मा आता
# ज्यानं बाप येई वाचता...




लेखन : सुरेश शांताराम पवार

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# द्या हो असा चष्मा आता
# ज्यानं बाप येई वाचता

## सुरेश शांताराम पवार

# द्या हो असा चष्मा आता
# ज्यानं बाप येई वाचता.

## लेखक: सुरेश शांताराम पवार

मच मॅक्स हाऊस ‘592/अ, वैशाली कंट्रक्शन, झेंडे कॉलनी,
लक्ष्मी नगर, चिंचपाडा, कल्याण, पूर्व,
जिल्हा ठाणे, पिन: 421306
भ्रमण दरध्वनी 9323 955301

इ मेल sureshpawar9323955301@gmail.com

मुखपृष्ठ- सुरेश शांताराम पवार

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : १ मे २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. 80/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- सुरेश शांताराम पवार - 9323 955301

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

# सुरेश शांताराम पवार



कवी, लेखक, दिग्दर्शक, अभिनेता

पत्ता 592/अ, वैशाली कंट्रक्शन,
झेंडे कॉलनी, लक्ष्मी नगर,
चिंचपाडा, कल्याण, पूर्व, जिल्हा
ठाणे, पिन: 421306

फोन-9323 955301

नोकरी : कल्याण डोंबिवली महानगरपालिका सहाय्यक सुरक्षा अधिकारी

जन्म दिनांक : 19 जून 1967

शिक्षण: HSC

साहित्य:

- व्यसनमुक्ती वरील पहिला चारोळी संग्रह "मित्रहो जमेल तेवढं घ्या" प्रकाशित.
- "अजूनही वेळ गेलेली नाही" एकांकिका संग्रह प्रकाशित.

- संत रविदास जीवनावरील "कर्मयोगी म्हणावे त्यास" हे दोन अंकी नाटक प्रकाशित.
- आजवर महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेकरिता 15 नाटकं लिहून दिग्दर्शनासह अभिनय देखील केलेला आहे. व आजवर लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, यांसह सर्वोत्कृष्ट अभिनय करिता 5 वेळा रौप्य पदक तर अनेकदा गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त आहे.
- व्यावसायिक रंगभूमीवर "तुम्हीच ठरवायचं".. "अशी ही चुंबकचुंबी..".. "शोध बाई शोध" या नाटकाचे अनेक प्रयोग झाले आहेत. तसेच "चिमटा" हे बालनाट्य अनेक स्पर्धांमध्ये गेली अनेक वर्ष विजेते ठरत आहे.
- संत रविदास यांचे जीवनावरील दोन तासाचा डीव्हीडी चित्रपट प्रकाशित असून संत रोहिदासांची मुख्य भूमिका साकारली आहे.

तसेच अनेक मराठी मालिकांमधून छोट्या छोट्या परंतु लक्षणीय भूमिका साकारल्या आहेत.

# अर्पण....

त्या एका 'जोकर'ला...
ज्याने आयुष्यभर रडगाणं हसत-हसत गायलं,
आणि हसत-हसतच पडद्याआड गेला.

त्या माझ्या बा ला ...
ज्याच्या फाटक्या खिशात माझ्यासाठी नेहमी एक पाव जास्त असायचा,
ज्याच्या रापलेल्या हातात माझ्यासाठी नेहमी मायेची ऊब असायची,
आणि ज्याच्या डोळ्यात माझ्यासाठी नेहमी स्वप्न असायची...

ज्याने चप्पल शिवता-शिवता माझं आयुष्य शिवलं,
ज्याने स्वतःचा घसा कोरडा ठेवून मला अक्षरांचं पाणी पाजलं,
आणि ज्यानं 'भगोड़ा' न होता 'आधार' होऊन सावरलं...

बा,
तू जरी कमी शिकलास पण मला खूप काही शिकवलंस.
तू पोटभर जेवलास नाहीस, पण मला उपाशी झोपू दिलं नाहीस.

तू हक्काचं छप्पर पाहिलं नाहीस, पण माझ्या डोक्यावरून कधी आभाळ सरकू दिलं नाहीस.

तुझ्या काळजाच्या प्रत्येक ठोक्यात दम्याचा श्वास होता,
पण तरीही त्या प्रत्येक श्वासात माझ्यासाठी धीर होता.
तू वेदना लपवून जगलास, पण माझी वेदना कधीच दिसू दिली नाहीस.

आज मी लिहितोय... ते तूच बोलतोयस.
आज मी जगतोय... ते तुझ्यामुळेच जगतोय.
हा ग्रंथ नाही, तुझ्या कष्टाची 'आठवण' आहे,
तुझ्या घामाचा 'अभिषेक' आहे,
आणि तुझ्या नावाचा 'जागर' आहे.

घे बा... हे तुझंच आहे.
तुझ्या 'सोन्या'कडून
तुलाच अर्पण.

सुरेश सरस्वती शांताराम पवार

द्या हो असा चष्मा आता

ज्यानं बाप येईल वाचता.

बहूदा... भिकारचोट नशीबाच्या यादीत माझ्या बा चं नाव पयलं असावं... म्हनूनच की काय माझ्या बा ला मनसोक्त झोडल्याबिगर त्याच्या बा चं भागत नसावं ... त्यात माझ्या बा च्या बा चा दराराच असा का माझ्या बा ची आय बी माझ्या बा ला दिसभरात कवचितच दिसायची.. हा, पर येकदा का रात झाली का त्या मिट्ट काळोखात बा च्या आय ची खरखरीत बोटं बा च्या अंगावर जणू चांदनच शिंपायची... अशातच माझा बा टुकूटुकू करीत इयत्ता सातवी पतुर पोचला. तवा सातवी म्हंजी तशी चीक्कारच ... येकदा का ती परिक्षा पास केली का शिक्षकाची नोकरी हमखास मिळनार... पन नेहमीपरमानं नियतीला काय ते मंजूर नव्हतं. म्हंजी पाठोपाठ कोसळलेल्या कौटुंबिक आपत्तीमुळं माझ्या बा ची शाळा कायमचीच सुटली... न्हाई, ती त्याला सोडावी

लागली... मग काय, माझा बा त्याच चक्रात गुरफटत- सुटत- गुरफटत- सुटत अधिकच भरडू लागला... बरं त्यातच माझ्या बा चं लग्न जमवून उरकलं बी गेलं ... अर्थात पुढं मी जलमलो अन खानारं येक तोंड आजूक वाढलं...पन त्या त्या वेळच्या परिस्थितीशी जुळवून घ्यायला शिकलेला माझा बा मोठ्या हिमतीनं संसाराचा गाडा चालवू लागला. पर सालं नियतीला काय ते मंजूर नसावं... कारन अवघ्या महिन्याभरात माझ्या बा चा बा... बा ची आय... अन माझी बी आय.. या जगात राहिलीच नाय... मग माझा बा आक्षी सून्न ... जनू दगडच झाला ... पुढं पुढं तं म्हनं माझा बाबा आक्षी माणसातनं ऊठल्यागत झाला व्हता... एकदा तं म्हनं समद्या भावकीची राखरांगोळी करायलाच निघाला व्हता.. पन त्याच येळी दोन अडीच वर्षाचा मी असा काय हंबरडा फोडला का आगीवानी तापलेला माझा बा जागच्या जागीच थंडावला.... अन मग माझ्याकडं येकटक बघत काय ईचार केला कुनास ठाव.. पर मला पोटाशी गच्च धरत सरळ मुंबईचाच रस्ता धरला...

मुंबई .... महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील परत्येक मराठी मानसाचा आत्मा म्हंजी मुंबई.. जी कुनासाठी आस्ते जीवाभावाची स्वप्न नगरी.. तं कुनासाठी मदमस्त माया नगरी... ज्यांना कुठंच कसला ठावठिकाना नस्तो त्यो बी शेवटी मुंबईच्या आश्रयाला येतो. मग हळूहळू आपलं बस्तान कायमचंच बसवतो.. अन बिच्चारा मुंबईकर.. अतिथी देवो भव: म्हनत त्यांना त्यांच्या गुनदोषासकट स्वीकारतो. वा व्वा गं माझी मुंबई.. कशी फेडू तुझी पुन्याई. तुम्हाला सांगतो, अगदी काल-

परवाचीच गोष्टये.. माझी लाडकी मुंबई चक्क माझ्या सपनात आली... खरं तं

जाम टेन्शन मंदीच दिसली. मग मी बी जरा तिला हळुवार हटकली तशी लहान पोरागत रडायलाच लागली.. अन रडता रडता आपली व्यथा बी सांगू लागली.

"लेकरा, सात बेटांची मी. माझं मूळ म्हणजे कोळी.. पण आज कोळीवाड्याची झालीये होळी आणि परप्रांतीय करतायेत रोजच दिवाळी.. मग त्याच दिवाळी पहाटेत माझा मराठी माणूस घसा फाडित गातोय फुसकी आणि कृती शून्य गाणी ... मराठी पाऊल पडते पुढे ss अरे बाळांनो, अजून किती पुढे .. कर्जत- कसारा, वसई- विरार संपलं रे.. मग माझा रखवाला कोण.. सांगा मुंबईकरांनो, माझा रखवाला कोण"..?

त्याच वेळी कोनीतरी माझ्या कानापाशी जोरानं बोंबललं.. "कौन है बे.. अब तक सोया है.. ऊठ्ठौ ". म्या दचकून जागा झालो. पाहतो तं काय.. समुर येक उघडाबंब भैय्या .. ज्याच्या मते या मुंबईत मीच उपरा... परमेश्वरा सपनातली मुंबई तं गेली पन काळजातली मुंबई टिकवायलाच हवी. अन त्यासाठी प्रत्येकानं आपलं हे... म्हंजे आपलं ते.. ते म्हंजे आपलं हे.. छ्या , नक्की काय करायला पायजे..?? कोडं हाये. जटील कोडं हाये.. पन माझ्या बा बद्दल बोलू तेवढं थोडंच हाये...

आता माझा बा मुंबईला आला खरा पन त्यांच्यासाठी अगदीच नव्या असलेल्या या नगरीत पारच गांगरून गेला... त्यातच अगदी सग्या सोयऱ्यांनी अन वळखीच्यांनीबी आधार नाकारलेला.. हा, पर त्यातल्या

त्यात येक बरं व्हतं का माझ्या काळजीपोटी का व्हईना पर माझ्या बा चा राग बराच थंडावलेला.. अन एकूनच वागन्या-बोलन्यात येक आश्चर्यकारक असा गोडवा आलेला.... त्यामुळं फिर फिर फिरूनबी कुठंच नोकरी न मिळाल्यानं माझ्या बा नं आपला परंपरागत असा चप्पल दुरुस्ती चा धंदा येका झाडाखाली सुरू केला... अन वर ठळक अक्षरात येक बोर्ड सवताच रंगवला...” गतप्राण पादत्राणांना त्राण आणून देणारं एकमेव ठिकाण... “ खरं तर तसा डोकेबाजच व्हता माझा बा... जो चपला शिवता शिवता मला अशी काय अक्षर वळख शिकवायचा का त्या शाळेच्या शिक्षनापेक्षाबी मी माझ्या बा च्याच शिकवनीत जास्त रमून जायचा.... मला अजूनबी आठवतंय... तवा आमच्या बाई अगदी तालासुरात म्हणायच्या... “ग रे गवताचा..“

मग मी बी शेम टू शेम तस्संच म्हनायचो.. ग रे गवताचा.. पन लगेच माझा बा मला त्याच्या अनुभवानुसार येगळच शिकवायचा....

“ग रे गरिबीचा....” अन मग गरिबी काय आस्ते ते ईस्कटून ईस्कटून सांगायचा ...

मग मी अधिक उत्साहानं म्हनायचो.. म रे मक्याचा... यावर बा म्हणायचा,

“म रे मदतीचा, परोपकाराचा.” मग माझा बा माझ्या त्या बाल हृदयात परोपकार भिनवायचा.. मंग मी आनंदानं हसत हसत आपल्या पोटावरून गोल गोल हात फिरवत म्हनायचो.. भ रे भटजीचा ... तसा माझा बा बी ऊपहासानं हासत म्हनायचा .. “न्हाई रं सोन्या.. भ भ

भाकरीचा...” अन मग ती भूक येळेला कशी मारायची हे तितक्याच हसतमुखानं शिकवायचा. मंग मातुर मी अगदी उदासपनं म्हणायचो.. न रे नळाचा.. तसा माझा बा खवळायचा.. अन् आक्षी विरश्री संचारल्यागत गर्जायचा... “न नळाचा न्हाई.. तं न न नायकाचा... व्हय नायकाचा....” अन मग त्याच्या मनातला 'अस्वस्थ नायक ' त्यो माझ्यात उतरवायचा... अगदी आत... आ s त खोलवर उतरवायचा...पर मधीच येकायेकी मूड बदलला का गि-हाईकाच्या चपलेचा खीळा ठोकता ठोकता येकांदं गानं न्हाईतर येकांदी कविता हमखास आयकवायचा... अन ती बी कशी तं अगदी तालासुरात.... “बालपणी मज फुलझाडांचा, नाद असे फार...” आई गsss.... चपलेला खीळा ठोकत असताना बा च्या हातून त्यो सटकन उडाला अन माझ्या कपाळावरच आदळला... मंग काय, ते सारं बघून माझा बा आक्षी येडापिसा झाला.... खरं तं त्यायेळी मला मोठी जखम अशी झालीच नव्हती पन जनू माझं डोस्क फुटल्यागतच बा ची हालत झाली व्हती ... त्यामुळं त्यो मला कुशीत घेऊन गोंजारत काय व्हता... अन लख्ख दिसत असून बी खीळा लागलेली जागा धा- धा येळा चाचपडत काय होता.... तुम्हाला सांगतो तवा अगदी आवर्जून वाटाया लागलं का रोज येकदा तरी असाच खीळा उडावा अन माझ्या बा चा हा असा सहवास मला सतत मिळावा.... खरच किती सुरक्षित वाटायचं त्यायेळी माझ्या बा च्या कुशीत....

तसा माझा बा हा जन्माचाच कष्टाळू... तवा त्यानं कधीच कुनाकडं भीक अशी मागितली न्हाय... हा, पर स्वताहून कुनी दिलंच काय शीळपाकं तं त्याच्या परतफेडीसाठी पडंल ती काम करायचं

कधीच टाळलं न्हाय... तसं कवाकवा कुनी आगदी ताजं ताजं... म्हंजी येकदम गरमागरम आन्न जरूर द्यायचं पन सालं त्या सवयीच्या थंडगार आतड्यांना ते नाहीच पचायचं... कारन त्यायेळी आमच्या रोजच्या जेवनातला बेस्ट खुराक म्हंजी काय तं पाव.. पन या पावाबरोबर दुसरं काय याचा निरनय मातर त्या त्या येळच्या कमाईवर ठरायचं. ...मग कधी पावासोबत असायची उसळ तं कधी वडा- भजी- मिसळ.... कधी कापलेल्या केळींचा मोट्ठाला वाटा तं कधी कच्चा कुळदाचा मसालेदार आटा... कधी जास्त सार असलेलं लोनचं ... तं कधी काय काय नी काय ... ??? पन प्रत्येक येळी पाव काय चुकायचा न्हाय... त्यात माझ्या बा ची येक आगळीच गंमत असायची .... म्हंजी, त्या येळच्या गणितातलं नुसतं पाढंच न्हाई तं पावकी- निमकी- सवायकी- दिडकी आक्षी तोंडपाठ असूनबी माझ्या बा ला त्या पावांची समान वाटनी कवाच न्हाय जमायची .... कारन त्यो जवा पाच पाव आनायचा तवा पाचातलं तीन पाव मला द्यायचा ... सात पाव आनलं तं चार मला द्यायचा .. अन सवताला नेहमीच येक पाव कमीच घ्यायचा ... पर मग येकदा म्याच हटकून बा ला ईचारलं ..." ए बा, तू दर येळेला चुकतो अन् सवतासाठी एक पाव कमीच आनतो.. का..? का असं करतो..? तसा माझा बा आक्षी गोड हासत म्हनला, "आरं, सोन्या, वाढती भूक हाय तुझी.. जमलं तेवढी जपतो... " आज मला कळतंय, माझ्या बा चं गनित कच्च न्हाई तं येकदम पक्क व्हतं.. जे माझ्या पुढील जीवनाचा पाया भक्कम करत व्हतं

तसा माझा बा भले फाटका पन रहायचा अगदी नीट नेटका... म्हून तं चपला शिवता शिवता फाटकी- तुटकी मनं बी जोडायचा ... अगदी घट्ट... पर मग माझ्या बा च्या मनाचं काय? का त्याला मनच न्हाय ?? का त्यो ऊफराट्या काळजाचाच हाय???

न्हाय तं मग तुम्हीच सांगा, अवघ्या महिन्याभरात येका पाठोपाठ सवताचा बाप- आई अन बायकोचं मरन डोळ्या देखत अनुभवताना त्याला काहीच का वाटलं नसंल ..? आवो हातभर न्हाई पर बोट भर तरी त्याचं काळीज फाटलं आसंल ? च्यायला , लागोपाठ दहावं-बारावं- तेरावं... दहावं बारावं तेरावं... मग त्यानं काय मरावं ?? काय... काय करावं..?? काऽय बरं करावं... तू बी अन मी बी... येकच प्रश्न बा चा...जगावं की मराव..? जगावं, लेकराला वाढविताना मर्दा सारखं जीनं.. का मरावं हार मानून अन वाढवावं मरेपर्यंत दारू पिनं....

पिनं... मला अजून बी लख्ख आठवतंय त्यायेळी माझा बा मला त्याच्या खांद्यावर बसवून दारूच्या गुत्त्या पर्यंत न्यायचा ... मग मला सावकाश उतरवुन माझ्या इवल्याश्या मुठीत मोठाले उकडलेले चणे ठीवायचा अन त्या चनेवाल्याच्याच शेजारी मला बसवून त्यो गुत्त्यात जायचा... मग मी बी त्या घान वासाची पर्वा न करता ते मस्त मोठाले चने खान्यात रमून जायचो... अन मग चनं संपलं का तिथं येणारं- जाणारं अशा संमद्याच लोकांस्नी मी आक्षी निरखूव बगीत -हायचो.. तवा त्यायेळी मला एक प्रश्न हटकून पडायचा का तिथं येताना सीधा - सरळ येनारा मानूस जाताना मातूर येडा वाकडा डुलत का जायचा..?? वर चित्र विचित्र घाणेरडं असं काय बाय बडबडत का जायचा... ? हा, पर माझ्या

बाला मी कवाबी तसा झुलताना, डुलताना कवाच न्हाई पाहिला .. का कवाबी माझ्या बा ला रस्त्याच्या कडेला लोळताना बी न्हाई पाहिला ... बरं तसं तं आजुबाजूला कितीक बा रोजच बघायचो मी... आगदी पोराला तळहाताच्या फोडापरमानं जपनारा बा जसा बगायचो तसा पोटच्या पोरीचं सर्वांग ओरबाडनारा बापही बगायचो... पर माझा बा सगळ्यांपेक्षा खूपच येगळा व्हता.... म्हून तं त्यो माझा कायम हिरोच व्हता ... जनू यवरी यंग म्यानच. ज्यांनं बिन छपराच्या फूटपाथवर राहुन बी मला बारावी पतुर शिकवीलं... सवताच्या पोटात चिमट्यांचं गोडाऊन करताना मला काय बी कमी पडू न्हाय दिलं.... सवताच्या संमद्या इच्छांचा पार वनवा केला पर मला कुना म्होरं झुकू नाय दिलं... सवताच्या कपड्यांचीच न्हाई तर देहाची बी पार लक्तरं करून घेतली पर माझं जरासं बी ढुंगण कवाच दिसू न्हाई दिलं ...म्हून तं अभिमानानं म्हनतो... माझा बाप माझा नुसता हिरोच न्हाई तं माझा खराखुरा देव बी व्हता....

दुसरं येक महत्त्वाचं म्हंजी माझा बा बघावं तेव्हा प्रसन्नच दिसायचा ... पन खरंच का त्यो प्रसन्न असायचा..?? का गावच्या जत्रेतल्या नाटकात केलेला अभिनय त्यो त्याच्या जीवनात बी करायचा...??? कारन माझ्या बा ला रडतांना असं मी कवाच पाहिलं नव्हतं... कदाचित येकाच महिन्यातल्या लागोपाठ त्या तीन मृत्यूच्या धक्क्यांनी त्याच्या डोळ्यातला तलाव पार आटला असावा.... पर मग ते काय असायचं... जवा बा येकलाच स्वतःशी हसत राहायचा... का त्या हसण्यातच त्याचा आक्रोश असायचा..?? जो फकस्त त्याचा त्यालाच कळायचा...

पन लोकांचं काय...? माझ्या बा चं असं हसनं बघून ते त्याला बावन्न पत्यातला जोकरच समजायचे... खरं तर माझ्या बाला कुनी असं जोकर बोललेलं मला अजीबात न्हाई आवडायचं... पन हळूहळू ते मला पटायाच लागलं... कारन जीवनातल्या कंच्या बी सिक्वेन्स मंदी माझा बा आक्षी फिट्ट जो बसायचा....

तुम्हाला सांगतो ...त्यायेळी माझा बा मला रोज शाळंत सोडायला अन न्यायला तं यायचाच यायचा... अन मधल्या सुट्टीतबी न चुकता मला खाऊ घेऊन यायचा... मग कंदी चिमनी बिस्कीट तं कंदी लिमलेटच्या गोळ्या... कंदी चनं कुरमुरं तं कंदी कुरकुरीत नळ्या... शिवाय मधल्या सुट्टीत बा ला बघून मी धावत पळत येनं... अन त्यानं आनलेला खाऊ खुशी खुशीनं संपविनं... खरंच ती मज्जा काई औरच व्हती... बरं मधली सुट्टी संपल्याची घंटी व्हताच वर्गात परत जाता जाता मागं वळून गोड हसत बा ला टाटा करणं... आ हा हा... संमदच कसं गोड अन हवंहवंसं वाटायचं. पन साली गंमत बघा .. जस जसा मी मोठा होऊ लागलो तस तसं माझ्या बा चं गबाळं ध्यान मला जास्तच खटकू लागलं... इतकच न्हाई तर त्यानं मला सर्वांसमोर घट्ट जवळ घेत कुरवाळनं, गोंजारनं हे संमदच आक्षी अवघडल्यागत वाटू लागलं... का बरं वाटत असावं आसं...? बा तं वाईट नव्हता... कवाच नव्हता.. मंग तरीबी...?? कोडं हाय जटील कोडं हाय.

तसं आजूबाजूची बरीच लोकं बऱ्याचदा म्हनायची का माझा बा चेहरा वाचायचा ... खरंय, बा चेहरा वाचायचा पर दुसऱ्यांचा ... माझा चेहरा न्हायच जमला त्याला वाचायला... म्हून तं मी 12 वी ला गेलो

तरीबी माझा बा मला कॉलेजला सोडायला अन न्यायलाबी यायचा... ज्याचा मला जाम म्हंजी जामच राग यायचा...

पन आज मातुर त्या येळच्या त्या नुसत्या आठवनींनबी खूप गलबलून येतं... कारन त्यानंतर आज पातुर अस्सं इतकं माया लावनारं... इतकी वाट बघनारं...अन इतकी काळजी करनारं भेटलंच नाही कुनी... बस एक माझा बा ... मुळात माझ्या बा नं एक पक्क जानलं व्हतं का जोकरनं कवाच रडायचं नसतं .. झालं कितीक बी त्याचं हसं.. लोकांना बस हसवायचं असतं.

तसा माझ्या बा चा गळा लईच गोड व्हता... शोधिसी मानवा ... देहाची तिजोरी ... या भक्तीगीतांबरोबरच... भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी .... सांग कधी कळणार तुला भाव माझ्या मनातला... या सारखी भावगीतंबी अगदी तल्लीनतेनं म्हनायचा अन संगतीनं मला बी म्हनायला लावायचा... शिवाय त्या येळच्या ऐतिहासिक नाटकातले मोठ मोठाले संवाद माझा बा एका दमात अन दमदारपनं म्हनायचा जे आयकून त्या येळेला माझ्या अंगावर तं शहारंच यायचं... खरं सांगायचं तं त्यातूनच मला नाटकाची गोडी लागली... अन मग मी बी माझ्या बा सारखंच मोठमोठालं संवाद म्हणायचा प्रयत्न करू लागलो... तशी नाटकाची दोन चार पुस्तकं व्हतीच बा जवळ... जी फडक्यात गुंडाळून कायम ऊशालाच ठीवायचा... अन जवा मनात येई तवा आक्षी रंगमंचावर असल्यागतच म्हनत रहायचा... मग येनारे जानारे जनू येड्यातच काढायचे माझ्या बा ला ... पन मला मातर त्या आवेशातला माझा बा जाम आवडायचा... बरं त्ये नाटकाचं पुस्तक

हातात घेऊन बा ला प्राऊंटींग करता करता त्या भुमिकेचा जोश माझ्यातबी संचारायचा...ज्याचं कौतुक माझ्या शाळेत बी सारखं सारखं व्हऊ लागलं... अन मग शाळेच्या हर ये़क नाटकात मलाच मुख्य काम मिळू लागलं.... मग मी बी ते काम जीवतोड करायचो... अन ते बघून तं माझा बा जाम हरकून जायचा... अन त्याच खूशीत मला नायगावच्या मोरवाडी नाक्यावरिल दुधवाल्याकडचं जाड,घट्ट मलईवालं दूध घेऊन ध्यायचा ... जे पीतांना जनू अंगात दहा हत्तीचच बळ यायचं...

पुढं पुढं माझी नाटकाची गोडी बघून माझा बा मला दादर, नायगावच्या कामगार कल्याण केंद्रात होनाऱ्या नाटकाला बी घेऊन जायचा... तशी गनपतीत अन नवरात्रीत भोईवाड्याच्या सदाकांत ढवण मैदानात अन नायगावच्या पोलिस मैदानात भारी भारी नाटकं व्हयची... अन ती बघायला गर्दी बी चिक्कार असायची.... पन माझा बा सगळ्यांच्या आदुगर येऊन अश्या मोक्याच्या जाग्यावर बसायचा का तिथून नाटक बघायला लईच मज्जा यायची... शिवाय संमदी नट नट्या कशा डोळंभरून पहायला मीळायच्या... अन हो त्यायेळी येक गोष्ट मला सतत जानवायची का नाटकातल्या टाळीबाज वाक्यावर पहिली टाळी ही माझ्या बा चीच असायची... जी क्षनात बरसात बनून गुंजायची... म्हंजी माझा बा नाटक चांगलंच जानायचा..

पुढं त्या नाट्य येडातूनच गोडी लागली ती वाचनाची... म्हंजी अवांतर वाचनाची... शाळेचं पुस्तकं न्हाई. ती वरवरच वाचायचो... त्यातच काई वडीलधारी मंडळी मला नवाकाळ पेपर मोठ्यानं वाचून दाखवायला सांगायची अन मी बातम्याच न्हाई तं छोट्या मोठ्या

जाहिरातीपासून तं मटक्याच्या आकड्यापर्यंत संमदच वाचून दाखवायचो. त्येबी आक्षी रेडियोवर बातमी दिल्याच्याच थाटात... पन खरं सांगू तं चांदोबा, चंपक, लोकप्रभा , लोटपोट, मायापूरी, मार्मिक, दक्षता, षटकार , किशोर, अम्रूत, ईसापनीती , राजा रानी व जादूच्या गोष्टी हेच वाचायला जास्त आवडायचं. मग ऊरलेल्या येळेत काय तं कदी चंद्रकात काकोडकरांचा श्रूंगार..., तं कदी बाबूराव अर्नाळकरांचा थरार... कदी चिंतामण लागूची समुद्री दुनिया तं कदी बाबा कदमांचा कौटुंबीक माया... कदी प्रेमचंद कदी सुहास शिरवाळकर... कदी केशवसुत तं कदी मर्ढेकर... कदी अत्रे, देशपांडे, जोशी तं कदी शांता शेळके , ज्योत्ना देवधर अन वसंत कानेटकर.... तसं त्या येळेला कित्ती अन काय काय वाचलं याची यादी केली तं एक कादंबरीच व्हईल इतकं मी आधाशागत वाचीतच -हायचो... बरं त्या येळी माझं वय वर्ष काय तर जेमतेम 12 ... अन अशा गरीबीत मला इतकी सारी पुस्तकं वाचायला मिळायची कशी ... तं मी रिकाम्या येळेत रद्दीच्या दुकानात जे काम करायचो... त्यामुळं तिथं रद्दीत येणारं सगळंच्या सगळं म्हना वा जास्तित जास्त म्हना पन मी संमदं साहित्य आवडीनं वाचून काढायचो. फुकट. आता तुमचा ईश्वास बसनार न्हाई कदाचित पन अगदी त्या वयात मी चक्क रामायन महाभारत, भगवतगीता, गनेश पुरान, शिव पुरान, ईष्णु पुरान, नवनाथ कथासार, बायबल अशा धार्मिक पुस्तकांबरुबरच पिवळ्या कवरातली कामशास्त्र, कोकशास्त्र अशी पुस्तक बी वाचायचो... ती बी बीनधास्त... कारन मुळात मी अशी पुस्तक वाचीत असंन आसं कुनाच्या सपनातबी नसायचं... हा पन हेबी खरय का

आजच्या सारखी त्या येळेला रद्दीच्या दुकानात संत-महापुरूषांची चरित्र मला तरी नाय सापडायची ... न्हाय तं वाचली आसती ती बी सारखी सारखी... अन आसतो कदाचित येगळा आजच्यापेक्षा... तसं शाळेच्या पुस्तकात संत अन् महापुरुषांची थोडीफार माहिती असायची पन मुळातच अभ्यासाचा जाम तिटकारा असल्यामुळं ते उघडून बघायला बी जीवावर यायचं... तसं तं पुस्तक ह्ये बी अन त्ये बी... पन येक बरं झालं ... या सततच्या वाचनामुळं माझी भाषा शैलीच बदलली... ईतकी का माझं सवंगडीच न्हाई तर मोठ मोठी मानसं बी मी बोलत असताना जणू आ वासल्यागत आयकत रहायची... बरं हे मला तवा न्हाई तं बऱ्याच वर्षानं कळलं.... तसं त्यायेळी वर्गात कुनी गोष्ट सांगायची तर हमखास पयलं मलाच ऊठवलं जायचं... अन आमच्या

भागवत बाई तं सर्वांसमुर म्हनायच्या की... ईसाप नीती मधील दहा बारा ओळींची गोष्ट चक्क साठ-सत्तर ओळीपर्यंत खुलवून सांगावी तर एस एस पवार यानंच... खरं तं मला बी गोष्ट सांगायला जाम आवडायचं..... मग पुढं पुढं त्यातूनच गोडी लागली ती भाषन करन्याची....

मला आठवतं .. मी 7 वीत असतांना आंतर शालेय भाषण स्पर्धेत पहिल्यांदा भाग घेतला अन माझा आवडता छंद या विषयावर दमदार भाषन करून आमच्या म्युनिसिपल शाळेसाठी पयल्यांदाच अशा स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावला.... अन हे आयकून हेड मास्तरांनी लगेचच आपल्या खिशातलं 10/- रूपय दिलं बक्षीस म्हनून... तं भागवत बाईनं मोठ्या मायेनं माझ्या चेहऱ्यावरून हात फिरवत आपल्या डोक्यावर बोटं

बी मोडली... पुढं त्ये पैसं संपलं... त्यो काळ बी सरकला ... पन ती आठवन मातूर आजबी जशीच्या तश्शीच हाय... म्हून की काय माझ्यासाठी आजवर जेवढ्यांदा टाळ्या वाजल्या त्या त्या प्रत्येक येळी मला आमच्या भागवत बाई तश्याच माझ्या चेहऱ्यावरून मायेनं हात फिरवीत आपल्या कपाळावर बोट मोडताना दिसल्या ... दिसतात..

तशी माझी आई अगदी माझ्या लहानपनीच वारलेली...हा येक बहीन व्हती पन ती बी माझ्या जन्माआधीच वारलेली... त्यामुळे मला लहानपनापासूनच आय भनीची माया ना कवा जानवली ना कवा समजली... अन त्यामुळेच की काय भागवत बाईंनी केलेली ती शाळेतली माया माझ्यासाठी अमृताहुनबी गोड अशीच व्हती... तुम्हाला खोटं वाटंल कदाचित पन त्यायेळी बरं का मी बाहेर दोरीवर, छोट्या झाडांवर वाळत घातलेल्या साड्यांमध्ये हरवून जायचो... म्हंजे मी हटकून त्या साड्यांना अगदी चिकटून- घासूनच जायचो... कधी कधी तं मी खरच चुकून गुरफटलो आसं भासवत त्या साडीत स्वतःला लपेटूनबी घ्यायचो... तुम्हाला सांगतो क्षनभर का व्हईना पन त्यायेळी लई म्हनजे लईच सुखावल्यागत वाटायचं... पन दुसऱ्या बाजूनं.... जवा येकांदी माय आपल्या लेकराला आपल्या अंगाखांद्यावर खेळवताना पहायचो... का आपल्या लेकराला छातीशी घट्ट धरून त्याचा गालगुच्चा घेताना पहायचो... का बाळाशी लाडं लाडं बोलत त्याला घास भरवतांना पहायचो... मालिश करतांना,आंघोळ घालतांना अन नट्टापट्टा करून छान सजवतांना पहायचो... का त्याला जरा कुठं लागलं तर जनू आभाळ कोसळल्या गत हातातलं सगळं काम सोडून त्याच्यावर

मायेचा वर्षाव करताना पहायचो तवा का कुनास ठाऊक पन मला कसंतरीच व्हायचं... इतकंच नाही तं रस्त्यावरल्या सिनेमातबी असं काय बाय दिसलं तर मी पडदा सोडून दुसरीकडच बघीत बसायचो... आन त्यो प्रसंग संपला का मग पुन्हा पडद्याकडं बघायचो... आज त्या विचारानं जाम हसू येतंय खरं पन त्यावेळी मातुर माझं हसनं हे आतल्या आतच हळहळायचं... पन येकदा का बा समोर आला का मंग त्ये संमदं ईसरून त्याच्या खांद्यावर मस्त डुलतांना चक्क आभाळालाच चिडवायचो का... "आत्ता थोडाच तं दूर हायेस माझ्यापासून... जरा थांब .... मंग कस्सा मुठ्ठीत पकडतो बघ तुला ... "

त्या वेळी बरं का इच्छा असून बी हवी तशी आंघुळ कवचितच मिळायची... म्हंजे मला अन माझ्या बा ला बी... पन तरी आम्ही मिळंल तेवढ्या पान्यात सवताला साफ- सुफ करायचो.... खरं तं सार्वजनिक नळाच्या बाजूला डबाभर पानी घेऊन एका कोपऱ्यात पन उघड्यावरच आंघोळ करताना लईच शरम वाटायची... त्यामुळं व्हायचं काय का बऱ्याचदा माझी अंघुळ म्हंजी जनू कावळयाचीच आंघुळ व्हायची ... शिवाय तिथं चड्डी बदलताना तर पार तारांबळच उडायची... बरं त्या येळची आनखी येक गंमत म्हंजी मी कोनत्या बी येळेला आंघुळ करो .. नळामागच्या बैठ्या चाळीतली ती घाऱ्या घाऱ्या डोळ्यांची गोरी पान नीलाक्षी बरोबर नळावर पोचायची अन पानी भरनं सोडून बिनधास्त माझ्याकडंच बघत राहायची.... मग साली माझी गोचीच व्हयची... कारन मी तसंच ऊभं रहावं तं माझ्या बरगड्यांची मलाच धास्ती अन तिच्याकडं पाठ करावी तं ढुंगनावर चड्डी फाटकी ... मग मी चक्क

मुटकुळं करून झपकन खालीच बसायचो... तशी माझ्यापेक्षा दोन तीन वर्षांनी लहानच व्हती ... म्हंजे मी सहावी ला तर ती तिसरी का चौथीला व्हती... हा पन ती हसली का अशी गोड दिसायची का बस... वाटायचं येकदा तरी तिच्याशी खूप खूप बोलावं... पन एकमेकांकडं बघन्याशिवाय दुसरं काहीच नाही घडलं. कवाच न्हाई ... तुम्हाला सांगतो पुढं चक्क 6 वर्षापर्यंत बी आम्ही एकमेकांना फकस्त बघतच व्हतो... अन सगळ्यात महत्वाचं आसं का येकांदा शब्दच काय पन कंचा इशारा बी एकमेकांना कवाच करत नव्हतो... तशी मुळात ती फारशी मिसळायचीच न्हाई कुनात... येक शाळा सोडली तं घर अन तिची ओसरी एवढंच तिचं विश्व ... हा पन त्या वयात मला मातर एक समजत नव्हतं का जवा मी तो एरिया सोडून लोअर परळ ला निघालो तवा तीचं डोळं इतकं डबडबलेलं का व्हतं.....? भले आज कळतंय सारं पन....

तसं त्या सार्वजनिक नळावर कपड्याच्या साबनाचा येकांदा तुकडा बऱ्याचदा सापडायचा .. त्यात बी 501 साबणाचा हमखास ... नायतर त्यो साबन ठेवन्याच्या परमनंट जागेवर घसाघसा हात घासताच जो फेस यायचा त्योच साऱ्या अंगाला चोळायचा... तुम्हाला सांगतो त्यो फेस लावल्यावर मग येकांद्या काळ्याशार दगडानं अंग घासतांना अन समदा मळ खरवडून काढतांना जाम भारी वाटायचं.... एकदा बरं का कसं कुनास ठाऊक पन आंघोळ करता करता म्या सहजच बा ला म्हंलं... "बा या दगडानं अंगावरचा मळ तं गेला पण मनातल्या मळाचं

काय..?" तसा माझा बा आक्षी जोकरवानीच हसला अन मग राज कूपर स्टाइल मधी म्हंला.......

"सोप्पय.. आपलं मनच दगडावानी घट्ट करायचं... मग ते कधी मळत न्हाई... जळत बी न्हाई... संकटाच्या लाटांनी झीजतं खरं पन साला कळतच न्हाई... अगदी त्या दगडाचा बारीक खडा झाला तरी बी न्हाई..."

खडा... असाच एक खडा आयुष्यभर ओरखडा बनून गेला... व्हय मला आजबी आठवतंय... त्या दिशी लोनच्याच्या खारा सोबत पाव खात व्हतो अन दुसऱ्याच घासाला मी आक्षी जीव चालल्यागतच तोंडातल्या घासासह कळवळलो... कारन समोरच्या त्या खडूस म्हाताऱ्यानं आपल्या बॅचकितनं माझ्या पाठीवर येक खडा जो मारला व्हता... तुम्हाला सांगतो आक्षी बंदुकीच्या गोळीवानीच लागला मला... मग मी रडत भेकलत मागं वळलो तर त्यो खडूस माझ्यावर जनू कुत्र्यागतच भुकला... "मादरचोद, माझ्याकडं गांड करून बसतो काय रं भडव्या... ऊठ... दलींदर साला...." खरंच त्यायेळी माझ्यात ताकदच नव्हती उठायची पन त्यानं जशी त्याच्या बेचकित दुसरा दगड भरन्याची तयारी सुरू केली तसा मी हातातला पाव तीथच फेकीत सुसाट पळालो. लांबवर... हा आता खडा लागलेली जागा जाम झोंबत होती खरी पन दुसरा खडा लागन्याची भीती बी तं नव्हती... तसं हे त्याचं माझं वैर मला सुरुवाती सुरुवातीला न्हाई कळालं पन नंतर नंतर त्यो खडूस म्हातारा माझा राग राग का करायचा हे कळालच... म्हंजी झालं होतं असं का त्या म्हाताऱ्याच्या कटकटी स्वभावामुळं अन सततच्या चिलीम

फुकन्यामुळं त्याची यवस्था घरा बायेरच्या जिन्या खालच्या जागेवर केलेली व्हती... तसं त्याला नीट चालताबी येत नसल्यानं मग त्यो कायम तिथंच पडून असायचा... अन नाश्तापानीबी त्याला तिथंच आनून दिला जायचा... पन तरीबी त्याची चिडचिड अन घान घान शिव्या देन्याची सवय काय जात नव्हती... बरं त्यो माझ्यावर राग कशापाय करायचा तं त्याच्या घरातले सगळेच्या सगळे लोक त्याला दूर अन मला खूप जवळ करायचे म्हून... बरं मी त्यांचा तसा कुनीच नव्हतो पन त्यांच्या इथं फुलांचे हार बनवायचो अन इतर पडेल ती कामंबी आनंदानं करायचो... मला आठवतं त्याबदल्यात ते मला येक येळचं जेवन अन तगड न्हाय तं काकड्यांच्या एक पुडी कळी चे हार बनविल्यास 50 पैसे रोख द्यायचे.. मी दोन पुड्या सहज संपवायचो... अन त्यांनी वाढलेलं जेवन मातर तिथं न जेवता माझ्या बा कडं घेऊन यायचो ... अन मग आम्ही दोघंबी एकत्रच जेवायचो... पन हे असं काम रोज रोज नसायचं ... म्हंजी जवा त्यांना जास्त गरज लागंल वा येकांदा सन-ऊत्सव आसंल तवाच ते मला हाराचं काम आन त्याबदल्यात जेवन द्यायचे. बाकीच्या वेळी कधी कडक तं कधी नरम असा पाव ठरलेलाच असायचा...

पुढं बऱ्याच वर्षांनी जवा त्या माझ्या बालपणीच्या एरीयात गेलो तवा मला कळलं का त्यो खडूस म्हातारा म्हनं कुथत कुथत मेला... म्हंजे झालं असं का म्हाताऱ्याची तीरडी धरलेल्या चार खांदेकऱ्यापैक एका खांदेकऱ्याच्या पायाला भवरी झाली व्हती... भवरी... जी नेमकी एका खड्यावर दाबली गेली अन खांदेकरी कळवळत लचकला... मग काय

म्हाताऱ्याची तिरडी क्षनातच भर रस्त्यात कोसळली... हे सारं ऐकून माझं काळीज हललं.. अन खूप वाईटबी वाटलं.. खरं तं कुन्या दुष्मनाची बी ही अशी शोकांतिका कवाच नाय व्हावी....

तसं सगळयात आधी का न्हाई आम्ही नायगाव पोलीस हेडकॉर्टर जवळच येका सरकारी इमारतीच्या जिन्याखाली झोपायचो... अन माझा बा तिथंच येका झाडाखाली चप्पल शिवायचा... समुर बहूसंख्येनं पोलिसच रहात असलेल्या बीडीडी चाळी... त्याच्या डाव्या हाताला कै. सदाकांत ढवण उद्यानाचा रस्ता... मग उजव्या हाताला सशस्त्र पोलीस हेडकॉटर... त्याला लागून पोलीसांचं परेड ग्राउंड... तं त्याच्याच समोरच्या बाजूला पोलिसांचं वाहनतळ... अन त्यालाच लागून माझी म्युनिसीपाल्टीची शाळा.... शाळा सुटली का परत येताना आमी पोरं पोरं त्या पोलिसांच्या गाडीत जाम खेळायचो... मधल्या हँडलला तं खूप लटकायचो... एकूनच काय तं संमद कसं छान छान व्हतं...

बरं रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठमोठाली अन घनदाट अशी चिक्कार झाडं ... ज्यांना चिक्कू सारखच पण येगळं अन लईच गोड असं फळ लागायचं... शिवाय त्याच झाडाची थोडीफार मोगऱ्यागत दिसनारी पीवळी, सफेद अशी फुलंबी जाम मस्त लागायची... व्हय ... आता नाव आठवत नाही त्या फळाचं आन फुलाचं बी पन त्यायेळी बऱ्याचदा त्याच्यावरबी ढेकर दिलीये मी... आता 'त्याच्यावरबी ' असं म्हणायचं कारन म्हंजी मी ती फुलच न्हाई तं बऱ्याचदा हातगाडी जवळ असलेल्या कलिंगडच्या साली काय अन अननसाच्या ऊभ्या आडव्या कापलेल्या लांबड्या सल्ल्या काय... त्यावरही भरपेट ढेकर दिलाय ....

अन हो भोईवाडा मार्केट मंदी भुकेपोटी चालता-चालता चपळाईच्या हातचलाखीनं येकांदा लालबुंद टमाटा उचलायचा ... म्हंजे खरं तं चोरायचाच... अन मग त्यो तितक्यात चपळाईनं खाऊन बी संपवायचा... असं चार-पाच येळा केलं कि मंग छान असा ढेकर आपोआपच यायचा... हा पन बटाटा मातुर शिताफीनं खिशात लपवून मग निवांत भाजून खायचा... आज हे समदं चुकीचं वाटतंय खरं पन त्या येळी मात्र ह्ये आसं खान्याचा आनंद काही औरच असायचा... बरं यातलं कायबी माझ्या बा ला बिलकूल ठाव नसायचं... न्हाय तं माझी कलईच झाली आस्ती...

तुम्हाला सांगतो, येकदा असंच पोटभर कलिंगडच्या साली खाऊन झाल्यावर आक्षी थकल्यागत माझ्या बा पाशी आलो व ऊगाचच अभ्यास करायचं नाटकबी करू लागलो... तसं बा ला आली दया... मग मला माझ्या बा नं येक लालबुंद आशी कलिंगडची मोठी खाप ईकत आनली अन मोठ्या मायेनं मला खायला सांगीतली... खरं तं कलींगड माझ्या आवडीचच... पन आधीच माझं पोट जाम झालेलं त्यात येवढी मोठी कलिंगडची खाप बघून पोटातली आतडी एकसाथ विद्रोहाचीच हालचाल करू लागलेली ... मग काय मी माझी अक्कल चालवत खाता खाता मुद्दामहून कलिंगड खाली पाडलं... पन माझ्या बा नं बी तितक्याच चपळाईनं ते पडता पडता झेललं अन वरवरच्या रागातच मला भरवलं ... न्हवं .. माझ्या तोंडात जनू कोंबलं. शेवटी गळ्यापर्यंत आलेलं त्ये कसं बसं संपवून मी ऊरलेली साल फेकनार तं माझा बा माझ्यावर गुरकतच म्हन्ला.. "ए येड्या... असं अर्धवट खातात

व्हय .. पार सालीचा तळ दिसेपर्यंत खा... पौस्टीक आस्तय" यावर मात्र त्या स्थीतीतबी मी जाम हासलो... आजून बी हसतोय ... तसं आजबी मला गोड धोड खायला खूपच आवडतं पन त्याची पयली सुरुवात बी तशी गोडच झाली व्हती... म्हंजी सदाकांत ढवण उद्यानसमोरील अपना बाजार जवळ येक राशनचं दुकान व्हतं... तिथं एक मध्यम वयाचा आणि गोल मटोल बांध्याचा येक मानूस रेशन द्यायच्या कामावर असायचा... आता नीट आठवत न्हाई नेमकी कशी वळख झाली आमची... पन मी दुकाना बाहेर दिसलो की मला मान हलवून आत बोलवायचा अन मानेच्याच इशाऱ्यानं साखर घे म्हणायचा... मग मी बी माझ्या दोन्ही मुठीत गच्च मावल तेवढी साखर घ्यायचो अन आनंदानं निघतांना बा सारखच मागं वळून त्याला बी पहायचो... तुमाला सांगतो लईच गोड हसतांना दिसायचा त्यो... पण त्यात बी गंमत अशी का ना त्यानं मला कधी माझं नाव ईचारलं ना मी बी कवा सांगितलं .. बस त्याचा मानेचा ईशारा... अन मी मनातल्या मनातच त्याला म्हनायचो मामा. आता बाकी न्हाई आठवत काही.. पन त्यो गोड मामा अजून बी आठवनीतून गेला न्हाई...

तशी त्या येळची माझी संमदीच मित्र मंडळी जाम भारी व्हती... त्यातबी मया, सत्याप्पा, बशा हे तर आक्षी जीवलगच व्हते... बरं सत्याप्पा व बश्या हे मूळचे कामाठी ... जे छोट्या-मोठ्या टोपल्या बनवायचे... एका बांबू पासून अगदी पातळ पातळ पट्ट्या व लांबलचक काड्या बनविण्याचं त्यांचं ते कसब मला लईच आवडायचं... मग हळू हळू मी बी शिकलो ... अन त्यांच्यासारख्याच टोपल्या बांधून त्या

रंगवूबी लागलो.... आता माझ्या बा ला नाही आवडायचं ते ... पन मोठा ईरोध भी न्हाई केला कवा... बस त्याचं म्हननं येवढंच का आधी अभ्यास... जो मला मनापासून नाहीच आवडायचा. हा पन हस्तकला अन चित्रकला मातुर जाम आवडायची... ज्यामुळं गुळगुळीत काळ्याशार डांबरी रस्त्यावरबी मी खडू- कोळसा- विटेचा तुकडा यांच्या साह्याने मोठमोठाली चित्र जमंल तशी काढायचो अन रंगवायचो... मग कंदी देवांची तं कंदी नटनट्यांची.

एकदा तं गंमतच झाली... म्हंजी मी माझ्या परीनं छान गणपतीचं चित्र काढलं अन रंगवलं ... जवळपास चार फुटाचं असावं... मग मी माझं संमद साहित्य जिन्याखाली ठेवून त्या चित्रापाशी परत आलो तं मी उडालोच ... कारन त्या चित्रावर बरीचशी पैशांची नाणी पडलेली दिसली... बाब्बौ... पार हरखूनच गेलो... बरं काही ठिकानी तं कुनी फुलबी टाकलेली व्हती... खरं सांगायचं तर एक -दोन- तीन -पाच- दहा पैशांची ती गर्दी बघून मला मोह आवरला न्हाई... मी ते पैसं आधाशागत उचलू लागलो... अन त्याच वेळी माझ्या पाठीवर जोरदार धपाटा पडला... मी कळवळून मागं पाहिलं तं माझा बा उभा व्हता ... हा पन त्याच्या डोळ्यात मला अपेक्षित असलेला राग मातुर बिलकुल नव्हता ... मग मी तिथून पळायचा ईचार सोडला अन खाली मान घालून गपगुमान बा सोबत निघालो... पन येकायेकी बा थांबला .. अन वळून त्या चित्रपाशी गेला.... क्षनभरानंतर त्यो हळुवार खाली वाकला.... मला वाटलं आता ते संमदं पैसं त्यो घेनार... पन तसं कायबी घडलं न्हाई... माझ्या बाह नं त्या चित्राच्या पायाला हात लावून नमस्कार केला....

काहीतरी तोंडातल्या तोंडात पुटपुटला अन मग मला घेऊन सरळ निघाला... मी पुन्हा सवयीनं माग वळून पायलं तं सत्याप्पा अन बशा संमदं पैसं ऊचलून मस्त नाचत व्हते.

मग माझा बा मला घेऊन सरळ निघाला तो गटई कामावरच आला... अन लांबड्या चामडी पट्टीचे सळ काढून त्याच्या वेण्या बांधू लागला... मग मी बी उगाच काढायचं म्हनून दप्तर इस्कटू लागलो... पर माझा बा मुळचाच हुषार.... कारन मी जवा हळूचकन कान्या डोळयानं बा कडं पायलं तर त्यो मनातल्या मनात हसतोय ह्ये त्याच्या व्हटावरून कळत होता... मग मी जरा रागानं अन अगदी मोठ्यानं पाढं म्हनाया सुरूवात केली.. पन सोप्पा सोप्पा वाला.... म्हंजे 10 चा ... जो झोपेतनं उठवल्यावर बी तोंडपाठ व्हता... पन बा खरच हुषार.... त्यानं मधीच मला थांबवलं अन चक्क 13 चा पाढा म्हनायला सांगितलं... खरं तं माझी गोचीच झालेली.. पन अजून बी तसा रागातच असल्यानं पहिल्या पेक्षा जास्त मोठ्यानं बोलू लागलो... तेरा एके तेरा... तेरा दुने सव्वीस ... तेरा त्रिक .... तेरा... तसं बा नं मला हातानच थांबविलं अन मग पुढचा पाडा सवताच म्हनू लागला ... वर पाठोपाठ मलाबी म्हनायला सांगू लागला... मग काय .. मी बी आपलं अधिक तीन-तेरा नको म्हून बा च्या सुरात माझा चिडका सूर मिसळू लागलो... अन मग काय सांगू राव.... बघता-बघता 30 पर्यंतची बाराखडी कशी संपली तेच कळना... खरच माझा बा मस्त पाढं बोलायचा... तसं तं पावकी- निमकी- सवायकी दिडकी हि बी तोंडपाठच बा ची... पन मुख्य म्हंजे माझा बा संमदे पाढे अगदी तालासुरात म्हणायचा.... जनू एकांदं गानंच

आयकतोय असं वाटायचं ... मग पाढं संपलं तसं बा न माझं दप्तर वढून सौता कडं घेतलं अन कायतरी शोधू लागला.... तसा मी थोडा घाबरलो... कारन नुकत्याच नवीन घेऊन दिलेल्या वहीच्या मागच्या पानावर मी माझी चित्रकला पसरवलेली व्हती... पन बा न ती वही न काढता माझी चित्रकलेची वही भायेर काढली... पन तरी बी मी थोडा घाबरलोच कारन ती बी वही चित्र विचित्र चित्रांनी भरलेली होती... बा न ती वही पायली. चाळली अन चेहऱ्यावरची येक बी रेष न हलवता येका चित्राच्या मागची बऱ्यापैकी कोरी बाजू काढली... मग बोटा एवढी ऊरलेली माझी सीस पेन्सिल घेऊन बा स्वतःच चित्र काढू लागला... तुम्हाला सांगतो काही वेळानं मी अगदी अवाक् झालो... कारन माझ्या बा नं ये़कदम झक्कास असा गणपतीचा फोटो काढला व्हता... म्हंजे माझा बा मोठ्ठाच चित्रकार व्हता... शाळेतल्या गुरुजी पेक्षा भी मोठा... माहितीये, आज बी नटराज रूपातली गनपतीची मूर्ती बघितली का मला माझा बा अन त्यांना काढलेलं गणपतीचं ते नृत्य चित्र हमखास आठवतं...

तेवढ्यात बूट पॉलिश करायला गिराईक आलं तसं बा नं चित्र सोडून आपला हात हत्ती छाप पॉलीसच्या डबीकडं वळवलं... पन माझं ध्यान मातुर त्या चित्रातल्या बा नं काढलेल्या सफाईदार रेषांमध्येच गुंतलं... जे खोडरबर शिवाय गुंफलेलं व्हतं... येक बाकी खरं होतं का माझा बा कोणतं बी काम असू दे ते तल्लीनतेनच करायचा... ते बी त्याच्या आवडीचं भावगीत गुनगुनत... म्हंजे माझा बा परंपरागतचा कारागीर तर व्हताच पन चित्रकार- गायक- नट अन चांगला वक्ता बी

व्हता... कारन आजूबाजूला कायबी वाद-विवाद झगडा भांडन झालं तर हातातलं काम सोडून बा तिथं जायचा अन दोन्ही कडच्या लोकांना आपल्या मुद्देसूद बोलण्यानं असं काय शांत करायचा का जनू इथं काई घडलंच न्हाई असंच साऱ्यांना वाटायचं... त्यामुळे समदे पोलीसवालेबी माझ्या बा ला बऱ्यापैकी मानायचे...

"येकदा बा अन मी आपापल्या कामात रमलो व्हतो... म्हंजे बा आपल्या हास्तीनं नवीन चपले साठी खुरपलेलं चामडं ठोकीत व्हता ... अन मी प्रामानीकपनानं बाल भारती ची पानं येकटक बघीत नुस्ती चाळत व्हतो... त्याच येळी एक साधारन पन्नाशीचा... जाडासा पन बुटका अन खूपशी दारू प्यायलेला मानूस त्याची तुटलेली एक चप्पल हातात घेऊन कसाबसा माझ्या बा पाशी आला. अन तोंडावर पडता पडता स्वताला सावरत बा च्या पुढ्यात हातातली चप्पल फेकीत अगदी ताठ पनानं म्हन्ला, "ए मोच्या चल पटकन पट्टा शिव ..." तसा आस्तीनं चांबडं ठोकनाऱ्या माझ्या बा चा हात जागीच थांबला .. मग कपाळावरच्या आठ्या तानत बा नं त्याच्याकडं पायलं... तसा त्यो स्वताला सावरत, आवरत बाजूच्या काळयाशार दगडावर बसला... मग बा नं बी सवयी परमानं त्याची चप्पल झटकली अन शिवायला घेतली... तशी त्याची त्यालाबी न समजनारी बडबड मातर सुरूच व्हती... पन बा चं ध्यान आपल्या कामात... अन माझं ध्यान त्या मान्साच्या हावभावात... जशी चप्पल शिवून झाली तशी बा नं ती त्याच्याकडं सरकवली अन माझ्या डोक्यावर टपली मारत मला अभ्यासाची खून केली... मग काय मी अंदाजे ऊघडलेलं पान वाचल्यागत पाहू लागलो...

तवर त्या मान्सानं बसल्या जागीच ती चप्पल पायात घातली अन तसंच आपलं ढुंगण सरकवत सरकवत बा च्या अगदी जवळ आला अन बा समोरची चप्पल शिवायची आरी उचलून वर ती बा समोर येडीवाकडी नाचवत म्हनू लागला, "हे काय आहे रे मोच्या " बा नं तरीबी समजूतदारपना दाखवत त्याच्या हातातून ती आरी पहिल्यांदा काढून घेतली... अन केलेल्या कामाचं पैसं मागितलं... पन त्यो काय आयकन्याच्या हिशोबातच नव्हता... ऊलट त्यांनं आता बा च्या पुढ्यातली धारदार रापी उचलली व परत तशीच नाचवत पुन्हा तेच ईचारलं... "आता सांग, हे हे काय आहे रे मोच्या " मला वाटलं आता बा नक्कीच वैतागल. . कारन मला तं लईच राग आला व्हता त्या बेवड्याचा.... पन बा पुन्हा संयमानंच वागला अन त्याच्या हातातून ती रापी बी काढून घेत म्हनाला ... "येक टायम पैसं देऊ नका सायेब पन तूमी जा... माझं पोरगं अभ्यास करतंय."

आता त्या तशा प्रसंगातबी, "माझं पोरगं अभ्यास करतय" हे माझ्या बा चं वाक्य आयकून खरंच हसू आलं... पन मनातल्या मनात... कारन अभ्यास आनी माझं नातं एव्हाना तुम्हाला कळलेलंच हाये... त्यामुळं मी आजूक खाली मान घालून अभ्यासच करतोय असं दाखवू लागलो... पन त्याच येळी त्या मानसानं बा च्या हातातल्या हास्तीलाच हात घातला... आता खोटं वाटल कदाचित पन तरीबी बा चा संयम शाबूत व्हता .... त्यामुळं बा पुन्हा त्याचा हास्तीवरील हात सोडवू लागला .. पन त्यो बेवडा मानूस काय सोडण्याच्या ईचारात नव्हता उलट जास्तीचा जोर लावीत ती लोखंडाची हास्ती आपल्याकडंच वढू

लागला... अन आपला तोल सावरत तसाच उठू बी लागला मग मात्र नाइलाजानं बा ला बी उठावं लागलं... आता जानारे येनारे बी थबकले... दोघांची वढावढी बघन्यात रमू लागले ... तसा त्याचा जोर अधिकच वाढला... मग मातर मला रडूच फुटलं .... तसं बा नं माझ्याकडं पायलं अन मला गप राहन्यास नजरेनच सांगीतलं... मी रडनं गीळलं... अन त्याचयेळी त्या मानसानं येक जोराचा हिसडा देत बा च्या हातातली हास्ती हिसकावली ... शिवाय बा ला शिवीगाळ करत अन ती हास्ती वेडीवाकडी नाचवत सरळ बा च्या अंगावर धावून गेला ..... आता मातर बा नं चपळाईनं त्या बेवड्याचा हात पकडला अन आपली हास्ती त्याच्या हातातून काढून घेन्यासाठी धडपडू लागला ... बरं आता तरी त्यो मानूस थंडावल असं वाटलं मला पन न्हाई... ऊलट लईच आरडा ओरडायला लागला... मग काय बघता बघता पाच पंचविस बघे जमले... आता माझा बा व त्या बेवड्याची चांगलीच झटापट सुरू झाली त्यामुळं गंमत म्हणून बघणारी लोकं बी लांबूनच ... ए सोडा- सोडा .. थांबा ... असं काय बाय बोलू लागली... तं काई लोकं अधिकच ऊकसवतांना हं मार, पाड ... असं बी कोकलू लागली..

आता हे संमदं बघून माझं रडनं अधिकच वाढलं.. अन तितकच गपकन थांबलं बी... कारन

संमदी बघे मंडळी त्या क्षनी सर्रकन मागं सरकली... कुजबूजबी लागली... तं काई मागच्या मागच सटकली... मग मी बी नीट निरखून पायलं तं त्या बेवड्याचा पांढरा शर्ट लाले लाल झाला व्हता... म्हंजे झालं असं होतं की दोघांच्या झटापटीत ती हास्ती त्या बेवड्याच्या

डोक्याला लागून जखम झाली व्हती... त्यातच लई रगत गेल्यामुळं त्याला चक्कर आली अन त्यो खाली पडला... आता मातर बा खरच घाबरला... बघे मान्सं तं जनू जागीच गायब झाली.. मी बी हे सारं आ वासून बघीत व्हतो... तसं बा नं मला ऊचललं अन समोरच्या पान सुपारी ( गादी) दुकानवाल्याच्या पोरींकडं सोपवीलं... कारन त्या कधीमधी येऊन बळबळंच माझा अभ्यास घ्यायच्या त्यामुळं बा चा त्यांच्यावर लईच विश्वास मग माझा बा जो तडक निघाला तो डायरेक्ट भोईवाडा पोलीस स्टेशनला...

आता तिथं नेमकं काय घडलं हे माहीत नाही पन बऱ्याच वेळानं जवा बा परत आला तवा आल्या आल्या आधी मला उचलून घेत घट्ट छातीपाशी धरलं... अन गादीवाल्याच्या वा त्या पोरींच्या प्रश्नांना जास्त उत्तर न देता त्यांचं आभार मानल्यागत हात जोडून आपलं गटई दुकान आवरायला लागला... तसच जीथं जीथं रगत पडलं होतं तिथं पानी टाकून साफ करू लागला... हळू हळू आजूबाजूचे दुकानदार व इतर लोक एकेक करून बाला काय ना काय ईचारून माहिती काढून घेत व्हती... तं कुनी पुढं काय व्हईल .. कसं व्हईल असं म्हनत घाबरवत होती... तवा मला कळालं का माझ्या बा नं केलेल्या तोंडी तक्रारीवरून त्या बेवड्या मानसाला दवापानी करून तिथंच तात्पुरतं लॉकअपमध्ये ठेवलंय... तशी जखम लई मोठी नव्हतीच .. अन माझ्या बा चा आजवरचा पोलिसांनाबी माहित असलेला स्वभाव -वागणूक बघून अन आईविना लेकरू एकटं हाय याचा बी ईचार करून पोलिसांनी बा ला सोडलं व्हतं... हा पर पुन्यांदा असं काही करू नको असा हग्या दम बी

दिला व्हता... बरं त्या बेवड्याची दारू उतरल्यावर त्याला बी सोडून देनार व्हते असं मला आयकून समजत व्हतं... अन मग घडलं बी तसच... पन नंतर दोनच दिवसांनी तोच मानूस मला व बा ला पुन्यांदा दिसला ... म्हंजे त्यो परत दुकानावर काय आला न्हाई पन दूर उभा राहून बा कडं रागारागानं बघत राहायचा... लागोपाठ चार पाच दिवस तसंच घडत व्हतं ... मग बा ला काय वाटलं त्यालाच ठाऊक पन आपला गटई धंदा गुंडाळून बा नं ते ठिकान रातोरात सोडलं.... कायमचं....

आता गटई सामानाची पेटी, दोन चार कापडं , दोन चार बारदानं अन माझं दप्तर याशिवाय दुसरं सामानच नसल्यानं आम्ही ते सारं उचलून मूळ जागेच्या काहीसं पुढं म्हंजे भोईवाड्याच्या सीताबाई चाळी जवळ सन्नके यांचं जे मोठ्ठ चप्पल दुकान होतं तिथं आलो... मग वळखी वळखीन 58/F बिल्डिंग समोरील व कन्नड शाळेच्या अगदी शेजारील मोकळ्या पटांगणात रात्रीचं झोपू लागलो. तुम्हाला सांगतो त्यायेळी काळोख पडला रं पडला की "उडदू बिल्ली खाव" म्हनून वळखली जानारी येक जमात तिथं बायका पोरांसहित येगयेगळ्या चुली मांडून गुण्या-गोविंदानं झोपायची व पहाट होन्यापूर्वी निघून बी जायची. मात्र ती लोकं दिवसभर नेमकं काय काम करायची हे मला आज भी आठवत न्हाय... अन त्या येळी भी समजलं न्हाय... पन ती सारी येकसाथ यायची अन कसलाबी झगडा भांडन न करता जायची.... त्यामुळं व्हायचं काय तं आम्हालाबी पहाटंच उठून तिथून हलावं लागायचं. अन मग झोप पुरी न झाल्यानं मी लईच चिडायचो पन माझा बा शांतपनानं सीताबाई चाळी जवळ आपलं गटई दुकान मांडायचा... अन शेजारीच येकादं बारदान

टाकून माझं डोकं आपल्या मांडीवर घेत मला थोपटत राहायचा... जाम भारी वाटायचं तसं पडून राहताना...

मग थोड्या वेळानं एटलस सायकल वरनं नेहमीचा बशीर चाचा कडक अन नरम पाव सोबत खारी- बटर- टोस बी घेऊन यायचा... त्याच्या त्या वळखीच्या घंटीनं मी खाडकन उठून बसायचो .. तुम्हाला सांगतो, चाय बरोबर कडक पाव म्हंजे मला जीव की प्रानच ... त्यात माझा बाप त्यो येकच मोठाला कडक पाव रापीनं असा काय कापून द्यायचा का आपन खूप सारे पाव खातोय असंच वाटायचं... तशी साखर लावलेली तीन कोनाची खारी मला सतत खूनवायची पन बा नं ती कधीच ईकत घेतली न्हाई अन मी बी ती कवाच मागितली न्हाई... पन मनातल्या मनात मातर त्ये संमदच खायचो...

पुढं वळख वाढल्यानं त्या सन्नके यांच्या दुकानातून माझ्या बा ला अंगावर काम मिळू लागलं... म्हंजे चामडी चपलांना बारीक चामडी सळानं गोल शिलाई मारायची ... तुम्हाला सांगतो बा ची शिलाई आक्षी नक्षीदारवळनागत वाटायची ... तसं तं चामडी चप्पल बनवायचं काम लई म्हणजे लईच लांबलचक असायचं... कारन मोठ-मोठालं चामडं भिजवायचं मग ते चांगलं खुरपायचं... त्याची लोखंडी आस्तीनं पीटाई करायची... उलट-सुलट पात्रींग आखनी करून ते चामडं कापायचं... पुन्हा पीटायचं... मग ऊरलेले चामड्याचं तुकडं व्यवस्थित जुळवत अन चिखल मातीच्या मदतीनं सोल व टाच बनवायचं ... कापायचं ... शिवायचं .... मग पुन्हा आस्तीनं पिटाई करायची... पुन्हा आकारबद्ध कापायचं...अन मग काचेच्या तुकड्यानं संमदी बाजू घासून गुळगुळीत

करायची .... त्यायेळी बरं का काचेवर काच तिरकी घासून मग ती काच लाकडी चक्कीच्या किनारीवर धरून अन मग त्यावर जरा दाब दिला का अगदी सरळ रेषेत तुटणारी काच बघून खूप नवल वाटायचं... येक दोनदा बोट कापल्यावर मी बी शिकलो तशी काचेनं काच कापायला... मग कंपास घेऊन सभोवताली दुहेरी रेषा मारायची अन त्यामधे

लोखंडी पंच घेऊन नक्षी ऊमटवायची .... अशी खूप सारी काम असायची त्यायेळी... बरं ही झाली येक बाजू... म्हंजी दुसरीकडं लेदर- कुरुम- अस्तर- छील यांच्या सहाय्यानं चपलेचा पट्टा , अंगठा, वादी तयार व्हयची.. मग ती मशिनवर शिवली जायची अन केलेल्या निशाणी वर फिट केली का छान पैकी चप्पल तयार व्हायची....अन चकचकित पालीस केल्यावर तर ती भारीच चमकायची... हळूहळू किरकोळ चप्पल दुरुस्ती बरूबरच मी ईतर छोटी छोटी कामं बी शिकलो... त्यातही शेपटीच्या चामड्याचं बारीक बारीक सळ काढनं अन जराशा जाड सळाच्या वेन्या घालून देनं मला आवडायचं... अन लोखंडी पंच व हातोडीनं चप्पलवर नक्षी काढनं तं मला जामच आवडू लागलं ... हळूहळू मी चामडी पट्ट्यावर बी झरझर नक्षी छापू लागलो... तसं माझं हे संमदं काम माझा बा मोठ्या कौतुकानं बघायचा पन माझं शिक्षन अन शाळेचा ईचार आला का त्याच्या डोस्क्यात का मला कान पकडून सरळ पुस्तकात ढकलायचा.... खरं तं जाम राग यायचा तवा... वाटायचं, ही शाळाच नसती तर ह्यो कंटाळवाणा अभ्यासही नसता.

मला आठवतं.... त्या येळंला येकादं लफाट्याचं घरच न्हाई तर साधं छप्परबी आमच्या नशिबी नव्हतं... त्यामुळं मी अन माझा बा

पावसाळा सोडला तर कायम उघड्यावरच झोपायचो... त्यात बी मुंबईच्या परळ भोईवाड्यातील सलीम भाईच्या लाकडाच्या वखारी समोरील मोकळया मैदानात जास्त झोपायचो... कारन त्या भल्या मानसानं कवा आमच्या अंगावर खरकटं पानी टाकलं न्हाय.. का आमच्या आया बहिनींचा उद्धार करत आमाला हाकललं नाय वा आमच्यावर गपचूप दगडं फेकून बी कवा गंमत बघीत -हायला न्हाय... त्यामुळच की काय मला तर त्यो आक्षी देव मानूसच वाटायचा... बरं संध्याकाळ झाली रं झाली का त्यो मला त्याच्या वखारीवर हमखास बोलवायचा अन मस्त मस्त फळं खायला द्यायचा... शिवाय कायम मांडीवर बसवून मला जाम माया बी करायचा... ईतका की कधी कधी तं माझा जीव पार घुसमटूनच जायचा... बरं त्याचा हर येक शब्द बी कसा गोड गोडच वाटायचा. तवा मातर माझ्या बाल मनाला जरूर प्रश्न पडायचा... का त्यानं दिलेली ही फळ जास्त गोड हायीत का ह्यो हलीम भाई ?

एकदा तं गंमतच झाली... हा... म्हंजी त्या दिशी बरं का मी मस्त टिपूर चांदण्यात त्याच्या वखारी समोरील उघड्या मैदानात माझ्या बा संग बिनघोर झोपलो व्हतो... अन अचानक माझ्या ढुंगणाला कायतरी घासल्यावानी जानवलं ... हळू हळू तं त्ये टोचल्यावानी अन मंग जनू धक्काच दिल्यावानी जानवाया लागलं.... बस मी खाडकन डोळं उघडून मागं वळलो तं येक वळखीचाच आकार वखारीमंदी घुसतांना दिसला... मी डोळं फाडून त्याला पाठमोरा वळखू लागलो अन त्याच येळी माझ्या बा ला बी गदगदा हलवू लागलो... तसा माझा बा बी खाडकन उठला

अन मला घाबराघुबरा बघून अधिकच बिथरला... पन लगीच सवताला सावरत म्हनला,

"काय झालं रं सोन्या.. आरं बोल की... बोल...?" पर मी मातूर वखारीकडच सुन्नपणे बघतव्हतो... तसं माझा बा मला जवळ घेत अन मायेनं हात फिरवत म्हन्ला... "हं, आत्ता ध्यानात आलं... माझ्या सोन्याला सपान पडलं...! व्हय ना..? ये आता माझ्या कुशीतच झोप ... आर ये.." मग मी बी गप गुमान बा च्या कुशीत शिरलो.... पन मला काय झोप येईना... कारन माझी चड्डी अन अंगाखालचं पोतं वलं कसं झालं हेच मला कळना ... येक तं बाहेर टिपूर चांदनं ... म्हंजी पाऊस नाहीच.... बरं मीच मुतलो म्हनावं चड्डीत तर तसंबी न्हाई ... मग का बरं त्यो देव मानूस असा राक्षसागत वागला...??? का त्यो राक्षसच व्हता पन मला देव माणूस भासला.. कोडं हाय. जटील कोडं हाय.. पन माझ्या बा बद्दल बोलू तेवढं थोडंच हाय.

माझ्या बा ला बरं का दम्याचा लईच त्रास होता. पन तरीबी म्हणा का त्यासाठीच म्हना त्यो रोज गांजा वाढायचा तर कवा कवा चरस बी वडायचा.. तसं सुरुवातीला त्याचा त्योच आनायचा .. पन पुढं पुढं जास्त थकल्यानं ते संमदं आनायला मलाच सांगायचा. अन मग मी बी गप गुमान त्ये आनायला पळायचा... बरं त्या येळी गांजा आणि चरस कोन ईकायचा तर एक फुलांचा हारवाला.. मंदिराजवळचा. मुळात तवा कुनाला कसला बी त्याचा संशय नाही यायचा. कारन त्यो शाना हाराच्या पुडी सारखाच गांजा बांधून द्यायचा. अन मग मी बी अगदी भक्ती भावानं घेऊन यायचा.. मग त्यो गांजा साफ करणं.. येखादा थेंब

पानी टाकून मळनं.. नंतर चिलीम व त्यातला खडा व्यवस्थित साफ करनं.. त्यानंतर चिलीम भरून त्यावर सुतळीची जळकी गुंडाळी ठेवून मग कापडाची थापी खालच्या टोकाला गुंडाळून ती चिलीम बाच्या हातात देनं.. खरंच. मजा वाटायची ही संमदी काम करताना.. मग चिलीम मिळताच माझा बा माचीसची काडी पेटवून ती चिलीमीच्या वरच्या तोंडाला लावायचा अन असा काय झुरका मारायचा का बास ... हरी ओम ठस ठस .. आहा हा.. त्या येळेला माझ्या बा च्या त्या रापलेल्या चेहऱ्यावर थोडा येळ का होईना पन येक येगळाच आनंद दिसायचा... पन खरंच का असा आनंद आयुष्यभर पुरतो..? का आयुष्य पूर्न होन्याआदुगरच त्यो आपलं आयुष्यच संपवितो... आयुष्य माझ्या बा चं आयुष्य फारच थोडं.. म्हंजी अवघा 47 वर्षेच जगला.. खरं तर अजून खूप जगायचं होतं त्याला. म्हंजे माझं लगीन.. नातवंड बगायची व्हती त्याला.. म्हून तर मोठमोठ्यानं वरडून वरडून सांगत होता त्या दिवशी त्या केईएम हॉस्पिटलच्या डॉक्टरला "डॉक्टर, माझा बा बुधवारी गेला.. माझी आय पन बुधवारी गेली.. अन आज बी बुधवार हाय.. तवा काय बी करून मला वाचवा .. मला मरायचं नाय.. माझ्या लेकाचं माझ्या नंतर कोनीच न्हाय ... मला आजच ऍडमिट करा... मला वाचवा डॉक्टर.. मला वाचवा ss पन डॉक्टर कसलीच क्रिया प्रतिक्रिया न देता अगदी शांतपने म्हनाला.. काका, काहीच झालं नाही तुम्हाला. अगदी नॉर्मल आहात. दोन दिवसात ठीक व्हाल.

मग त्यानं काय बाय कागदावर लिहिलं अन ते घेऊन बाहेर जायला सांगितलं .. पन माझा बा काय डॉक्टर समोरून हटना.. तसं डॉक्टरच्या

इशाऱ्यावरनं तिथल्या वॉर्ड बायनं आपलं कर्तव्य बजावताना माझ्या बा ला आक्षी ढकलत ढकलतच बाहेर काढलं. अन माझ्या हातात त्यो कागद देऊन गोळ्या आनायला पाठवलं.. आता कसाबसा माझा बा ओपीडी बायेर आला खरं पन मग तिथंच ठान मांडून बसला.. अन पुन्हा मला ऍडमिट करा, ऍडमिट करा म्हून आरडाओरडा करू लागला. तोवर मी गोळ्या आनल्या अन् बा कडं दिल्या तं माझ्या बा नं रागा रागानं त्या समद्या गोळ्या तिथेच भिरकावल्या... आता मात्र तिथला वॉचमन हे समद पाहून जाम खवळला अन रागारागानं माझ्या बा च्या बकुटीला धरत,फरफटत सरळ हॉस्पिटल बाहेर हुसकावला. अन् वर संमद्या पेशंटकडं बगीत मोठ्या मस्तीत फुत्काराला .. माज आलाय भडव्याला... औषध गोळ्या फेकतोय.. मग इथं कशाला आई घालायला आला.. बस आपला माथा तिथंच सटकला. मग मी बी रागारागात जवळच्या बगीच्यातली वीट उपटली अन त्या वॉचमन वर फेकनार तोच आतून कसलासा सरकल्याचा आवाज आला आणि पाठोपाठ त्यो वॉचमन घसरून पडला.. आता त्यो कशावरून घसरला कुणास ठाऊक पन त्याचा चेहरा पार रक्ताळला व्हता अन् त्यातही त्यो अगदी पिसाळला व्हता.. कारण मुळात त्याचा पाय माझ्या बा नं फेकलेल्या गोळ्यांवरूनच घसरला व्हता.. तवा मी झप झप माझ्या बा ला तिथून जास्तीत जास्त दूर नेला. पन माझा बा चालता चालता अचानक थांबला... अन माझ्याकडं बघून पयल्यांदाच उदासपनं हसला अन लागलीच मला पोटाशी घट्ट धरून प्रचंड मायेनं गोंजारु लागला.. माझं पटापटा मुकं बी घेऊ लागला. अगदी भर लोकात, भर रस्त्यात.

खरच सांगतो.. त्यायेळी बिलकुल न्हाई वाटलं हो मला अवघडल्यासारखं... उलट माझा बा गेला तं पुढं आपलं काय.. या विचारानं सारं अंग थरथराया लागलं.. कसं कसं वाढवलं आसंल.. माझ्या साठी काय काय सोसलं आसंल ... त्यांना सारं साऽरं येकाच येळी दिसाया लागलं अन मग कसं कुनास ठाऊक पन माझ्या अश्रूंनी माझ्या बा चं पाय धुतलं गेलं तर बा च्या अश्रूंनी माझं शरीर न्हावून निघालं.. तवा माझ्या बा नं मला पोटाशी घट्ट धरल्यानं त्यो मला रडताना जानवत व्हता पन रडताना दिसत नव्हता.. शेवटी कुठल्या बी सीकवन्स मंदी आक्षी फिट बसनारा जोकरच त्यो. आपल्या दुःखाला सुहास्य सजवत प्रचंड मोठ्यानं हसला अन हसता हसता तिथंच संपला...

द्या हो.. द्या हो.. द्या हो असा चष्मा आता...

ज्यानं बाप येई वाचता

मी ही बाप झालो...

मी ही बाप झालो...

परी बाप तो बाऽप होता..

परी बाप तो बाप होता.

लेखन : सुरेश शांताराम पवार, कल्याण.. 9323 955301